# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १०/०५/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत बाजार चौक कळमेश्वर येथे दिनांक ०८/०५/२०२२ चे ११.०० ते ०९/०५/२०२२ चे ०२.३० सुमारास फिर्यादी नामे– शोभराज मांगोडी रघुवंशी, वय ५३ वर्ष, रा. महाजन लेआउट कळमेश्वर यांचे शोभराज बुट हाउस नावाचे दुकानाचे शटर अज्ञात आरोपीने वाकवुन खालुन अर्धे उघडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने ड्रॉवर मध्ये ठेवलेले १५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री गेडाम मो. क्र. ९५०३९७३६५७ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील मौजा डोरली येथे दिनांक ०३/०५/२०२२ चे ११.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– वनवास गोदक आंजणकर वय ५५ रा. डोरली व आरोपी क्र. १) प्रकाश आंजणकर व २) आशु आजंणकर दोन्ही रा. डोरली हे नातेवाईक आहेत. आरोपी १ व २ यांनी फिर्यादीला म्हटले की, 'घराची दहा फुट जागा माझी आहे, त्या जागेवर तुम्ही बांधकाम केले' या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीचे पत्नी सोबत भांडण व शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीची पत्नी खाली पडल्याने तिच्या कमरेला मार लागल्याने डॉक्टरी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा संगिता कोवे मो.क्र. ८७८८५९८०१० या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील ठाकरे बंधू ढाबा जवळील स्टील कंपनी महालगाव येथे दिनांक ०८/०५/२०२२ चे २०.०० वा. सुमारास निलेश रविन्द्र सोनकुसरे (मृतक), वय ३५ वर्ष, रा. पांढूर्णा जि. छिंदवाडा व त्रिवेन्द्रम मारोतराव धुर्वे (जखमी), वय ४१ वर्ष, रा. सावजापाणी जि. छिंदवाडा हे दोघेही नागपूर ते भंडारा जाणाऱ्या हायवे रोड क्रास करीत असता भंडारा कडून येणाऱ्या अज्ञात वाहन चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून दोघांना धडक दिली. या अपघातात निलेश सोनकुसरे यांचा मृत्यु झाला तर त्रिवेन्द्रम धुर्वे हे जखमी झाले.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनि श्री सतिश सोनेकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४, १७७ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भूरे मो.क्र. ७७२२००३३४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०२ कि. मी. मनसर ते रामटेक रोड इंडीयन बॉयलर फार्म रोडवर शितलवाडी येथे दिनांक ०८/०५/२०२२ चे २३.३० वा. ते २३.५९ वा. सुमारास फिर्यादीचे वडील मृतक— रमेश भैयाजी डडमल, वय ५५ वर्ष, रा. रामाळेश्वर वार्ड रामटेक हे एम.एच—४०/आर— ६३८० क्रमांकाच्या हीरो होन्डा मोटरसायकलने कैची माईन वरून रामटेक ला जात होते. त्यादरम्यान रामटेक रोड वरील इंडीयन बॉयलर फार्म समोरील रोड नी रामटेक कडुन मनसर कडे जाणाऱ्या अज्ञात ट्रक चालक आरोपीने आपला ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रमेश डडमल यांच्या मोटरसायकला जोरदार धडक देवुन त्यांच्या मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संजीवनी रमेश डडमल वय २२ वर्ष रा. रामाळेश्वर वार्ड रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो.क्र. ९८२२५६६१८० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**